**प्रेसनोट**

दि.०४/१०/२०२१

# पोलीस अंमलदारावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | शिरूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. ७६४/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक :- करणसिंग निहालसिंग जारवाल,<br>वय -२८, वर्षे, पद - पोलीस शिपाई, वर्ग - ३<br>तत्कालीन नेमणुक शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण.<br>सध्या नेमणुक लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन. पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये)<br>तडजोडीअंती २०,०००/- वीस हजार रूपये. |
| लाच स्वीकारली रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक ०६/०८/२०२१<br>गुन्हा दाखल दिनांक :- दिनांक ०४/१०/२०२१<br>यातील तक्रारदार यांनी जानेवारीमध्ये जुने जे.सी.बी. मशीन चार लाख रूपये डिपॉझीट देवुन चालविण्यासाठी घेतले होते. आरोपी लोकसेवक याने सदरचे मशीन चोरीचे असून ते पोलीस ठाण्यात जमा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदारांनी ते मशीन पोलीस ठाण्यात जमा केले. त्यावेळी तक्रारदारांना ज्याने मशीन दिले त्याच्यावर चोरीचा गुन्हा दाखल केला असल्याचे सांगून सदर गुन्हयामध्ये तक्रारदारास आरोपी न करण्यासाठी सुरूवातीस ५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रूपये लाचेची मागणी केली म्हणून लाच मागणीचा गुन्हा दाखल केला असून त्यामध्ये त्यास अटक करण्यात आली आहे.<br>तपास श्री. संदीप व्हाडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट हे करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे,श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.